प्रति,

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर,
यांना सविनय सादर,

**प्रतिवेदक** :- एफ.वाय.एस.सोलापुरे पोलीस उपनिरीक्षक दिघी पोलीस ठाणे पुणे,
यांजकडुन विनंती पुर्वक की,

**जावक क्रमांक :- ८८३५ /२०१७, दिघी पोलीस ठाणे पुणे, दिनांक :- २५ /१२/१७,**

**विषय** :- अनोळखी मयत व्यक्तीचे नातेवाईकाचा शोध होणेकामी पुणे पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दी मिळणेबाबत,

**महोदय,**

२/- उपरोक्त विषयान्वये सादर करतो की, दिघी पोलीस ठाणे अकस्मात मयत नोंदवही क्र.६७/१७ सीआरपीसी क.१७४ मधील खबर देणार पो.ना.७१४ चटापले ओपीडी ससुन हॉस्पिटल पुणे यांना खबर देणार मुकादम नामे ठोंबरे यांनी केसपेपर सह येवुन कळविले की, पेशंट नामे अनोळखी पुरूष वय ६५ वर्षे नांव पत्ता माहीत नाही हा दि.०५/०७/१७ रोजी १६/०० वा. चे सुमारास आदर्शनगर गणेशमंदिरजवळ दिघी पुणे येथे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने उपचारकामी १०८ ॲम्ब्युलन्स सोबत डॉ.धनश्री भुजबळ मो.क्र.८१४९४५६७८९ यांनी दि.०५/०७/१७ रोजी १७/०५ वा. ससुन हॉस्पिटल वॉर्ड क्र.७ मध्ये ॲडमिट केले असता, उपचारा दरम्यान दि. ०५/०७/१७ रोजी २१/०० वा. वॉर्डात मयत झाला. त्याचा एमएलसी नं.१३८५०/१७ असा आहे. अशी खबर मिळाल्याने यातील सहा.पोलीस उपनिरीक्षक एस.बी.टोके दिघी पोलीस ठाणे अनोळखी मयत इसमाचा इन्क्वेस्ट पंचनामा करून मा.वैद्यकिय अधिकारी सो.ससुन हॉस्पिटल पुणे यांचे करवी शवविच्छेदन करवुन घेवुन, त्यात मयतांस **HEAD INJURY** ने मृत्यु आल्याचे सर्टिफिकीट प्राप्त झाले असुन, वरीलप्रमाणे अकस्मात मयत दाखल करण्यात आले आहे.

सदर अनोळखी मयत इसमाचे नातेवाईकाचा सर्वोतोपरीने शोध घेण्यात आहे. तरी देखिल कोणीही नातेवाईक मिळुन आलेले नाहीत. दाखल अकस्मात मयतातील अनोळखी मयत इसमाचे नातेवाईकाचा अद्याप तपास चालु आहे. अनोळखी मयत इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| | अनोळखी पुरूष जातीचे मयत इसम, उ.व.६७, चेहरा उभट, नाक सरळ, रंगाने काळासावळा, उंची ५ फुट ५ इंच, अंगाने सडपातळ, केस काळे, पांढरे दाढी वाढलेली, डोकीस मार लागलेले |

तरी यातील वरील वर्णनाचे अनोळखी मयत इसमाचे नातेवाईकांचा शोध होणेकामी पुणे पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दी मिळणेस विनंती आहे.